**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत देशभरातल्या ५१ हजारांहून अधिक युवकांना नियुक्तीपत्रांचं वाटप
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरुन मन की बात द्वारे देशवासियांशी संवाद साधणार
- गेल्या दहा वर्षात देशातले १७ कोटींहून अधिक नागरिक गरीबीमुक्त झाल्याचा जागतिक बँकेचा अहवाल
- पोप फ्रान्सिस यांच्यावर रोममध्ये अंत्यसंस्कार

**आणि**

- इराणमध्ये बंदरात झालेल्या स्फोटात चारजण ठार, ५०० जण जखमी

**<><><><><>**

देशातले तरुण आपल्या कठोर परिश्रम आणि नवनवीन उपक्रमांमधून राष्ट्र किती सक्षम आहे हे जगाला दाखवून देत आहेत, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रीय रोजगार मेळाव्यात विविध सरकारी विभागांमध्ये नवनियुक्त ५१ हजारांहून अधिक तरुणांना दूरस्थ पद्धतीनं आज मोदी यांनी नियुक्ती पत्रं वाटली, त्यानंतर ते बोलत होते.

अर्थसंकल्पात सरकारनं उत्पादन अभियानाची घोषणा केली असून त्याचं उद्दिष्ट ‘मेक इन इंडियाला प्रोत्साहन देणं, देशातल्या तरुणांना जागतिक दर्जाची उत्पादनं बनवण्याची संधी देणं हे असून यामुळे लाखो सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग तसंच, लघु उद्योजकांना चालना मिळेल त्याचबरोबर

देशभरात रोजगाराच्या नवीन संधीही खुल्या होतील, असं त्यांनी यावेळी सांगितलं. देशाच्या प्रगतीत महिलांचं योगदान अतिशय महत्त्वाचं असल्याचा पुनरुच्चारही प्रधानमंत्र्यांनी केला. ते म्हणाले,

**बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी (३४ सेंकद)**

मुंबईत येत्या १ ते ४ मे दरम्यान होणाऱ्या वेव्हज २०२५ परिषदेचाही उल्लेख त्यांनी केला. या परिषदेमुळे डिजिटल कंटेंट क्षेत्राच्या भविष्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी (३४ सेंकद)**

१५ वा रोजगार मेळा आज देशभरातल्या ४७ ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. राज्यात मुंबई, पुणे, नागपूरमध्येही हे कार्यक्रम झाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवर ‘मन-की-बात’ कार्यक्रमाच्या माध्यमातून देश-विदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा १२१ वा भाग असेल. आकाशवाणी, दूरदर्शन, तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वरून मन-की-बात या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण होणार आहे. रात्री ८ वाजता विविध प्रादेशिक भाषांमधून या कार्यक्रमाचा अनुवाद प्रसारित करण्यात येईल.

**<><><><><>**

विमान कंपन्यांना प्रवाशांच्या सोयीसाठी विशेष उपाययोजना लागू करण्याचे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. आंतरराष्ट्रीय हवाई क्षेत्रावर असलेल्या निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर अनेक उड्डाण मार्गांमध्ये बदल करण्यात आला आहे, त्यामुळे उड्डाणाचा कालावधी वाढला असून तांत्रिक थांबे येण्याची

शक्यता जास्त आहे. त्यामुळे विमान कंपन्यांनी प्रवाशांना मार्गातले बदल, प्रवासाचा वाढीव वेळ आणि त्या दरम्यानच्या तांत्रिक थांब्यांविषयी माहिती द्यावी. तसंच, या प्रवासादरम्यान प्रवाशांसाठी पुरेसे अन्न पदार्थ, पाण्याची आणि विशेष जेवणाची सोय करण्याचे निर्देश दिले आहेत.

**<><><><><>**

देशातल्या तसंच जगभरातल्या लोकांच्या समस्या समजून घेत राग, भिती आणि द्वेषाचा सामना प्रेम आणि आपुलकीच्या माध्यमातून करता येऊ शकेल अशा नवीन स्वरूपाच्या राजकारणाचा अंगीकार करण्याचं आवाहन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलं आहे. ते आज हैदराबाद इथं सुरु असलेल्या भारत संमेलनाच्या समारोप समारंभात बोलत होते.

**<><><><><>**

मुंबई 26/11 च्या दहशतवादी हल्ल्यात आपला कोणत्याही प्रकारे सहभाग नव्हता असं तहव्वूर राणा या आरोपीनं चौकशीदरम्यान सांगितलं आहे. पाकिस्तान लष्कराच्या वैद्यकीय पथकात असलेल्या राणाने लष्कर-ए-तय्यबाच्या वतीने हल्ल्याच्या ठिकाणांची रेकी केल्याची माहिती या घटनेतला एक आरोपी डेव्हिड हेडली याने आधी दिली होती.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या वेव्ह्ज या उपक्रमांतर्गत इंडिया - अ बर्ड्स आय व्ह्यू स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यातल्या स्पर्धकांना भारताचं सौंदर्य, भौगोलिक दृश्यं, नवोपक्रम, वारसा, संस्कृती तसंच, प्रगती आणि परिवर्तन अधोरेखित करणारे २ ते ३ मिनिटांचे व्हिडीओ सादर करण्याच आव्हान देण्यात आलं होतं. या स्पर्धेत १ हजार ३२४ स्पर्धकांनी

नोंदणी केली होती. कठोर मूल्यांकन प्रक्रियेनंतर, प्रत्येक श्रेणीतल्या पाच अंतिम स्पर्धकांची निवड करण्यात आली. हे स्पर्धक येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या वेव्ह्जच्या अंतिम फेरीत सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

वेव्ह्ज २०२५ परिषदेअंतर्गत ॲनिमेशन फिल्ममेकर्स चॅलेंजच्या अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या ४२ स्पर्धकांमध्ये मुंबईच्या श्वेता मराठे यांचाही समावेश आहे. ‘मेल्टिंग शेम’ असं त्यांच्या ॲनिमेटेड लघुपटाचं नाव आहे. याबद्दल त्यांनी आकाशवाणीला अधिक माहिती दिली…

**बाईटः श्वेता मराठे (२६ सेकंद)**

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची यूक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी आज रोममध्ये भेट घेतल्याची माहिती व्हाईट हाऊसने दिली आहे. या भेटीत आपण पूर्ण आणि बिनशर्त युद्धबंदीवर चर्चा केली, या चर्चेसाठी ट्रम्प यांचे आभार, असं झेलेन्स्की यांनी आपल्या समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या दारिद्रय रेषेखालील नागरिकांची संख्या कमी होत असून गेल्या दहा वर्षात भारतानं १७ कोटी १० लाखांपेक्षा अधिक नागरिकांना गरिबीतून बाहेर काढलं आहे. भारतीय नागरिकांच्या आर्थिक स्तरात सुधारणा झाली असल्याचं जागतिक बँकेच्या ‘स्प्रिंग-२०२५’ च्या अहवालात म्हटलं आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्यप्रदेश या पाच राज्यांमध्ये अति गरिबीच्या स्तरात सुधारणा झाली असून २०११-१२ मध्ये

१८पूर्णांक चार दशांश टक्के असलेला गरिबीचा दर २०२२-२३ या आर्थिक वर्षात दोन पूर्णांक आठ दशांश टक्क्यांपर्यंत घसरला आहे.

**<><><><><>**

पोप फ्रान्सिस यांच्यावर आज रोममध्ये बेसिलिका ऑफ सँता मारीया मेगर इथं कार्डिनल जिओव्हॅनी बॅटिस्टा रे यांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. व्हॅटिकन सिटी इथून निघालेल्या या अंत्ययात्रेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, फ्रान्सचे अध्यक्ष ईमॅन्युअल मॅक्रोन यांच्यासह इतर अनेक जागतिक नेते, धर्मगुरू तसंच लाखो नागरिक उपस्थित होते.

सोमवारी पोप फ्रान्सिस यांचं निधन झालं होतं.

**<><><><><>**

इराणच्या बंदर अब्बास इथं शहिद रजाई बंदरात आज मोठ्या प्रमाणावर झालेल्या स्फोटात चारजण ठार किमान ५०० जण जखमी झाले आहेत. शहिद रजाई बंदर धक्का क्षेत्राजवळ साठवून ठेवलेल्या अनेक कंटेनर्सचा स्फोट झाल्यानं हा अपघात झाल्याचं वृत्त आहे. या स्फोटामुळे तेल वितरणावर कोणताही परिणाम होणार नसल्याचं इराणच्या राष्ट्रीय पेट्रोलियम शुद्धीकरण आणि वितरण कंपनीनं स्पष्ट केलं आहे. मात्र, स्फोटामुळे परिसराचं आणि काही उद्योगांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. या स्फोटांचं कारण अजून स्पष्ट झालं नसल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

सिक्किममध्ये दोन दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीने उत्तर सिक्किममध्ये दरडी कोसळल्या आहेत. त्यामुळे चुंगथंग-लाचुंग हा महत्वाचा मार्ग सहा ठिकाणी बंद झाला आहे. सीमा रस्ते संघटना तसंच स्थानिकांनी आज हा मार्ग हलक्या वाहनांसाठी मोकळा केला आणि  अडकलेले हजाराहून जास्त पर्यटक गँगटोकपर्यंत पोहोचले.

**//<><><><><>//**